मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १२८ ■ सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज, जलद आणि स्मार्ट!

# महापालिकेत पुन्हा रणरागिनींची ताकद ?

## सांगलीचं राजकारण महिला सत्तेच्या दिशेने ■ सभागृहाचे चित्र पालटून जाणार

**सांगली : गणेश पाटील**

**७८ सदस्यांच्या सांगली महापालिकेत येत्या निवडणुकीनंतर ३९ महिला नगरसेविका म्हणून महापालिकेच्या कारभारात लक्ष घालतील. २०१८ च्या सांगली महापालिका निवडणुकीत भाजपच्या तब्बल २२ उमेदवार निवडून आल्या आल्या होत्या. त्या तुलनेत काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या एकूण १६ महिलांनी नगरसेविका म्हणून सभागृहात प्रवेश केला होता.**




७८ सदस्यांच्या सांगली महापालिकेत तब्बल ३९ महिला सदस्या आपली विजयी पताका फडकावत महापालिकेच्या सभागृहात प्रवेश करणार आहेत. २०१८ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत सर्वसाधारण खुल्या गटासाठी असलेल्या ४५ जागांपैकी २१ जागा महिलांसाठी आरक्षित होत्या. ओबीसीसाठी आरक्षित असलेल्या २१ जागांपैकी ११ जागांवरून महिला निवडून आल्या तर अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी आरक्षीत ११ जागांपैकी सहा जागा महिलांसाठी आरक्षीत, तर अनुसूचित जमातीसाठी असलेली एक मात्र जागा अनुसुचित जमातीच्या महिलेसाठी आरक्षित होती. यावेळी चित्र काही फारसे वेगळे आहे, अशातील मुळीच भाग नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ओबीसी आरक्षणासंदर्भातील भिजत पडलेले घोंगडं मोकळं झाल्यामुळेच निवडणुकीचे सगळेच चित्र स्पष्टझालेले आहे. भाजपच्या महापौर संगीता खोत यांनी महापौरपदाचा कार्यभार सांभाळला. काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगली महापालिकेची निवडणूक काँग्रेसच्या दृष्टिकोनातून आता प्रतिष्ठेची राहिलेली नाही. विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात काँग्रेसचे बारा वाजले तर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या उभ्या फुटीमुळे अजितदादांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी सांगली महापालिकेच्या निवडणुकीसाठी आमने-सामने ठाकणार आहेत, महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा भाजपने निर्णय घेतला तर भाजपच्या ३९ महिला उमेदवार कमळाच्या चिन्हावर निवडणूक रिंगणात उतरल्याचे चित्र दिसून येईल. महायुतीतून निवडणूक लढवण्याचा भाजपने निर्णय घेतला, तर मग मात्र भाजपच्या महिला उमेदवार विजयी झालेल्या त्या २२ जागा सोडूनच महायुतीतील अन्य घटक पक्षांना अजितदादांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला त्यापुढील गणित सोडवावे लागेल. महिला आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाचा निर्णय झाल्यामुळे पुरुष उमेदवारांची मात्र गोची झाली आहे. सर्वसाधारण खुल्या गटासाठी केवळ ४५ जागा शिल्लक राहणार असून त्यांतील २१ जागा महिलांसाठी आरक्षित राहणार आहे. त्यामुळेच खुल्या गटात उमेदवारांची धावपळ उडणार आहे. महापौर निवडणुकीच्या वेळी विरोधकांकडून भाजपमधील सहा नगरसेवकांना फोडून राष्ट्रवादीचा महापौर निवडून आणला होता. आता ती स्थिती नसली तरी डाव - प्रतिडावाचे राजकारण खेळले जाणारच आहे. राष्ट्रवादीमध्ये पडलेली फूट हाच शरद पवार यांच्या पक्षाला मोठा सेट बॅक आहे. ही वस्तुस्थिती राजकीय जाणकार देखील मान्य करतात.

स्वबळाचा निर्णय असो की महायुतीतर्फे निवडणूक लढविण्याचा भाजपने निर्णय घेतला तरी २०१८ च्या निवडणुकीत सांगली महापालिकेतील ज्या जागांवर कमळ हातात घेऊन भाजपच्या महिला उमेदवार विजयी झाल्या त्या २२ जागांवर भाजप ठाम राहणार आहे. तथापि महापौर निवडीच्या वेळी दिग्विजय सूर्यवंशी यांच्यासाठी विरोधकांनी जे डावपेच खेळले आणि भाजपच्या उमेदवाराचा पराभव केला, तो करत असताना भाजपमधीलच सहा नगरसेवकांना आपल्या बाजूला वळिवण्यात यश मिळवले ती खेळी अतुलनीय अशीच आहे. भाजपचे सहाजण पक्ष शिस्त भंग मोडून काँग्रेस - राष्ट्रवादीच्या बाजूला गेले होते. नसीमा नाईक, अपर्णा कदम, आनंदराव देवमाने, गजानन मगदूम, बाळू सावंत व सावंत मॅडम यांनी महापौर निवडीच्या वेळी अनपेक्षित भूमिका घेतल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्याची तयारी भाजपने सुरूही केली होती, पण पुढील राजकारण गुलदस्त्यात गेले. आनंदराव देवमाने यांनी जनसुराज्य पक्षाचा रस्ता पकडला, त्यामागे आपल्याला उमेदवारी मिळणार नाही, भाजप उट्टे काढल्याशिवाय राहणार नाही हीच भिती असावी आणि या दहशतीतूनच आनंदराव देवमाने जनसुराज्य पक्षाच्या छावणीत घुसले.

गजानन मगदूम , बाळू सावंत, सावंत मॅडम यांनी घुमजाव करत भाजपमध्येच राहणे पसंत केले, तर नसीमा नाईक आणि अपर्णा कदम या दोघी मात्र राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या वाटेवर असल्याची राजकीय वतुर्ळात कुजबुज आहे. त्या दृष्टिकोनातून भाजपला फटका दिलेल्या नगरसेविकांची नावे भाजप उमेदवारीतून आपोआपच कट होऊन या ठिकाणी नव्यांना संधी मिळणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. 'महिलाराज' ला प्राधान्य देण्याचे धोरण मोदी सरकारने ताकदीने अवलंबीले आहे . निम्मी लोकसंख्या असलेल्या महिला पुरुषी वर्चस्वाखाली दबून जाण्यासारखी स्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळे ३९ महिला सभागृहात येतील, तेव्हा सभागृहाचे चित्र पालटून जाईल असे बोलले जात आहे.

## संक्षिप्त...

### श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**

सालाबादप्रमाणे याही वर्षी अलकुड-एस (ता.कवठेमहांकाळ) येथे सद्गुरू प्रभाकर आप्पा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दिनांक १० रोजी सकाळी श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.यावेळी भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वीणा व ग्रंथ पुजन करण्यात आले.तदनंतर पारायण सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.

### अंबाबाई मूर्ती संवर्धनास आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

करवीर निवासिनी श्री अंबाबाई मूर्तीची संवर्धन प्रक्रिया सोमवारी (दि. ११) व मंगळवारी (दि. १२) करण्यात येणार आहे. या दोन दिवसांमध्ये भाविकांसाठी मूळ मूर्तीचे दर्शन बंद राहणार असून उत्सवमूर्ती व कलश दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे यांनी दिली.

### कोल्हापूर खंडपीठात खटल्यांची यादी करण्यास प्रारंभ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर खंडपीठाचे कामकाज सोमवार (दि. १८) पासून नियमितपणे सुरू होणार आहे. यासाठी तारखेनुसार सहा जिल्ह्यांतील खटल्यांची यादी तयार करा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयातील नोंदणी विभागाचे निबंधक ह. म. भोसले यांनी दिले. याबाबतचे परिपत्रक शनिवारी काढण्यात आले आहे.

### न्यायालयाचा आदेश डावलून बांधकाम रस्त्यावर

**कराड : हॅलो प्रभात**

ग्रामपंचायत दप्तरी नोंद असलेल्या हद्दीतील रस्त्यावर बेकायदेशीर सुरू असलेल्या बांधकामाबाबत न्यायालयाने स्थगिती आदेश देऊनही शिवाजी भगवान मुळीक यांच्यासह अन्य दोघांनी बळजबरीने बांधकाम सुरू ठेवून न्यायालयीन स्थगिती आदेशाचा भंग केला आहे, असा आरोप किवळ (ता.कराड) येथील अमोल तानाजी मुळीक यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

### सांगलीत आज भाजपचा मेळावा

**सांगली : हॅलो प्रभात**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत सांगलीत भाजपचा मेळावा होणार आहे. दोन म ाजी नगरसेवक व काही कार्यकर्त्यांचा भाजप प्रवेश होणार आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांचे सोमवारी रात्रीचे जेवण एका काँग्रेस पदाधिकार्याच्या घरी होणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे.

# शाश्वत शेतीसाठी उत्पादनाची हमी महत्त्वाची : मच्छिंद्र कुंभार

## डॉ.डी.वाय.पाटील डॉ.स्वामीनाथन जन्मशताब्दी साजरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




भारताच्या हरितक्रांतीचे शिल्पकार व शाश्वत शेतीचे प्रणेते भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील योगदान असामान्य व अतुलनीय आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, हंगामानुसार नियोजन आणि यांत्रिकीकरण आत्मसात करून कृषी उत्पादनात वाढ करावी. उत्पादनाची हमी हेच शाश्वत शेतीचे यश असल्याचे प्रतिपादन कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी मच्छिंद्र कुंभार यांनी केले. भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त डॉ. डी. वाय. पाटील बी. टेक. अ‍ॅग्री महाविद्यालयात आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते.

श्री.कुंभार यांनी सेंद्रिय शेती, आंतरपिके, दुग्ध व्यवसाय, प्रक्रिया उद्योग, देशी गायींचे उत्पादन, पेरणी ते कापणी या प्रक्रियेत आधुनिक साधनांचा वापर, तसेच मियाझाकी आंबा आणि शेतीपूरक उद्योग यांबद्दल अनुभव मांडले. १ एकर शेतीत १६ प्रकारची आंतरपिके घेण्याचा यशस्वी प्रयोग त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. मजुरटंचाईवर मात करण्यासाठी यांत्रिकीकरण हाच प्रभावी उपाय असल्याचे ते म्हणाले. ४० हून अधिक मुलाखतींमधून आपले विचार मांडणारे आणि १४ राष्ट्रीय/राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त कुंभार यांनी विद्यार्थ्यांना करताना ज्ञान घेणे थांबवू नका, शेतीतील प्रयोग आणि नवकल्पना हीच पुढील पिढीसाठी खरी प्रेरणा आहे, बदलत्या शेती व्यवस्था आणि तंत्रज्ञान आत्मसात करून त्यामधील संधींचा शोध घ्या आणि आपल्या शेतीला समृद्ध बनवा असा संदेश दिला.

डॉ. योगेश शेटे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य इंजी. पी. डी. उके यांची प्रमुख उपस्थिती होती.राष्ट्रीय सेवा योजनेतर्गत कार्यक्रम अधिकारी इंजी. एस. ए. इंगवले यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सूत्रसंचालन कु. नम्रता शिंदे तर आभार प्रदर्शन कु. मैथिली गोंधळी यांनी केले.

# डीकेटीईच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय नवोन्मेष अभियानात कामगिरी

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**


डीकेटीई मधील मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी नवोन्मेष हेच भविष्य घडवते हा विश्वास कृतीत उतरवत पाच महिन्याच्या कालावधीत देशातील शाळेमध्ये राष्ट्रीय स्तरावरील मेड इन थ्रीडी सीड द फयुचर एंटरप्रनरर्स या प्रतिष्ठेच्या कार्यक्रमांतर्गत प्रोफ ेशनल मेंटर्स म्हणून शालेय विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन करण्याची ऐतिहासिक संधी साधली.

DKTE

पुणे येथील या स्पर्धेमध्ये इन्व्होवेशन, डिझाईन आणि उदयोजकता या संकल्पनेवर आधारित सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेत देशभरातील २६० हून अधिक महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता यामध्ये डीकेटीईच्या विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमठवला.

डीकेटीई कडून अनुज लुगडे व अरमान नायकवडी यांनी अटल इन्व्होवेशन मिशन,नीती आयोग, दिल्ली व द सॉल्ट सिस्टीम या अंतरराष्ट्रीय कंपनीच्या माध्यमातून या स्पर्धेत सहभाग घेवून चमकदार कामगिरी केली. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, प्रकाश आवाडे, डॉ सपना आवाडे, रवी आवाडे व सर्व विश्वस्त यांनी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना प्रा.डॉ.एल.एस.अडमुठे, डॉ यु.जे.पाटील, विभागप्रमुख डॉ व्ही. आर. नाईक, प्रा. सुयोग रायजाधव यांचे मार्गदर्शन लाभले.






## हा विरोध केवळ राजकीय हेतूने

मराठी मायबोलीत 'ये रे बैला...' अशी एक उक्ती आहे. त्याचा प्रत्यय लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निमित्ताने अलीकडील काळात वारंवार येतो आहे. पणजोबा पंतप्रधान, आजी पंतप्रधान, वडील पंतप्रधान, त्याच खानदानातील आपण म्हणजे पंतप्रधानपदावर आपलाच अधिकार आणि पंतप्रधान नाही तोपर्यंत काहीही बोलण्याचे तसेच वागण्याची आपल्याला सूट अशा भ्रमात राहुल गांधी हे वावरत असतात, त्याचा अनुभव निवडणूक आयोगावरून आला. निवडणूक आयोग चोरी करते असा आरोप ते वारंवार करतात, संविधानीक यंत्रणेविरोधात बोललो की, जनतेला ते आवडते अशा भ्रमात ते कदाचित असावेत. राहुल गांधी यांनी मतदारयाद्यांमधील घोळांवर प्रकाश टाकत निवडणूक आयोग व भाजप यांच्यावर संगनमताचा आरोप केला, पण त्यांचे पुरावे केवळ विसंगती दाखवणारे होते, संगनमत सिद्ध करणारे नव्हते. मतदारयाद्यांतील दुबार नोंदणी, चुकीची माहिती आणि बोगस नावे वगळण्याचे काम निवडणूक आयोग करत असून बिहारमध्ये ६५ लाख नावे तात्पुरत्या यादीतून वगळली आहेत. बिहारमध्ये 'एसआयआर' ला विरोध करणारे राहुल व त्यांचे सहयोगी पक्ष देशभरात ही प्रक्रिया राबवायला मदत करतील का?, असे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय निवडणूक आयोग आणि भाजपचे साटेलोटे असल्याचा गंभीर आरोप केला. त्यांनी मतदारयाद्यांमधील घोळांवर प्रकाशझोत टाकला. एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये मतदान, एकाच राज्यांत विविध मतदारसंघात नोंदणी, एकाच पत्त्यावर ७०-८० मतदार, बोगस नावांसह पत्ते असे अनेक मुद्दे त्यांनी पुराव्यानिशी दिले. निवडणुकांमध्ये घोळ होत असल्याचे दाखविण्याचा त्यांचा हेतू होता, पण त्यांनी आयोगाच्या हाती आयतं कोलीतच दिलं आहे. मतदारयाद्यांमधील घोळ जगासमोर आणत राहुल यांनी उलट निवडणूक आयोगाची बिहारमधील भूमिका कशी योग्य आहे, हेच सांगितले आहे. बिहारमध्ये आयोगाकडून विधानसभा निवडणुकीआधी मतदारयाद्यांची पुनर्पडताळणी केली जात आहे. त्याला राहुल यांच्यासह त्यांच्यासोबतच मित्रपक्ष जोरदार विरोध करत आहेत. ही मतांची चोरी असल्याचे, मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचे षड्यंत्र आदी आरोप आयोगावर केले जात आहेत. निवडणुकीच्या तोंडावर आयोगाने हाती घेतलेले हे काम बेकायदेशीर असल्याचा दावाही विरोधकांकडून केला जात आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, यूपीत मतदान आयोगाने मतदारयाद्यांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी एसआयआरची प्रक्रिया राबविली जात असल्याचे स्पष्ट केले. मतदारयाद्यांमध्ये दुबार नोंदणी असू नये, पत्ते, नावे, फोटो बरोबर असावेत, बोगस मतदारनोंदणी असलेली नावे वगळली जावीत, मृत्यू झालेल्या मतदारांची नावे वगळली जावीत, यासाठी ही पुनर्पडताळणी केली जात असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार तब्बल ६५ लाख मतदारांची नावे तात्पुरत्या मतदारयाद्यांमधून वगळली आहे.

राहुल गांधी कर्नाटकात अनेकांची दोन ठिकाणी नोंदणी असल्याचा दावा करत असताना बिहारमध्ये त्यांचे मित्र माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांचीही दोन मतदार ओळखपत्र असल्याचे समोर आले आहे. आयोगाने त्यांच्याकडे याबाबत माहिती मागितली होती. आता नेमकं हे कसं घडलं, हे लवकरच समोर येईल. पण यानिमित्ताने मतदारयाद्यांमध्ये अनेक त्रुटी असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. निवडणूक आयोग एसआयआरच्या निमित्ताने हेच दाखवून देण्याचा प्रयत्न करत आहे. राहुल यांनी पत्रकार परिषदेतून सादर केलेले पुरावे हे मतदारयाद्यांमधील घोळ दाखवत आहेत. त्यामळे आता आयोगाला आता केवळ बिहारच नव्हे तर देशभरात एसआयआरची प्रक्रिया सुरू करण्यासाठी निमित्त मिळाले आहेत. मतदारयाद्यांमधील हे घोळ नक्कीच दूर व्हायला हवेत. त्यासाठी राजकीय पक्षांनीही निवडणूक आयोगाला मदतच करायला हवी. एकीकडे एसआयआरला विरोध असताना बिहारमध्ये एकाही राजकीय पक्षाकडून अद्याप तात्पुरत्या मतदारयाद्यांवर हरकत नोंदविण्यात आलेली नाही. आयोगाकडून याबाबत रोज माहिती दिली जात आहे, आवाहनही केले जात आहे. मतदारयाद्यांमधील घोळावर बोलणाऱ्या राहुल यांच्या पक्षानेही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे हा विरोध केवळ राजकीय हेतूने होत आहे का, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो. बिहारमध्ये विरोध करत असलेले राहुल गांधी देशभरात ही प्रक्रिया राबवायला मदत करणार का?, हा ही प्रश्नच आहे. कारण पुढील काही महिन्यांमध्ये बिहारसह तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या मोठ्या राज्यांतही विधानसभा निवडणूक होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये तर बांगलादेशीय, रोहिंग्या यांचा महापूर आल्याचे बोलले जात आहे. लाखो घुसखोर पश्चिम बंगालमध्ये आहेत, आणि त्यांना हटवा अशी भाजपची मागणी आहे, आता राहुल गांधी यांनी एक नवीनच संधी निवडणूक आयोगाला प्राप्त करून दिली आहे, त्यामुळेच नाहक मोठेपणा दाखवायला जाऊन पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरोधात राहुल गांधी गेले आहेत का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# नैसर्गिक सौंदर्याची भूमी : दादरा आणि नगर हवेली

**अफाट निसर्गसौंदर्य आणि हिरवळीने संपन्न, दादरा आणि नगर हवेली देशातील सर्वात सुंदर केंद्रशासित प्रदेशांपैकी एक आहे. वनगंगा तलाव, हिरवा वन उद्यान, दुधनी, सातमलिया हरण उद्यान, वासोना लायन सफारी, नक्षत्र गार्डन ही आणखी काही आकर्षणे आहेत.**

मराठा आणि पोर्तुगीज यांच्या दीर्घ संघर्षातून १७ डिसेंबर १७७९ मध्ये मराठा सरकारने मैत्रीची खात्री करण्यासाठी दादरा नगर हवेलीतील गावांमधून १२,००० रुपयांचा एकत्रित महसूल पोर्तुगालला भरपाई म्हणून दिला. २ ऑगस्ट १९५४ पर्यंत पोर्तुगीजांनी या प्रदेशावर राज्य केले. १८ व्या शतकाच्या शेवटी पोर्तुगाल हे या प्रदेशात आले. १९५४ ते १९६१ पर्यंत हा प्रदेश स्वतंत्र दादरा आणि नगर-हवेली प्रशासन म्हणून ओळखला जात होता. ११ ऑगस्ट १९६१ मध्ये दादरा नगर हवेली भारतामध्ये विलीन झाले व भारताचा अविभाज्य घटक बनले. तसेच या प्रदेशाला केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित केले. दादरा नगर हवेली, दमण आणि दीव हे केंद्रशासित प्रदेश भारताच्या पश्चिम भागात गुजरात ते उत्तर महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये स्थित आहेत.

दादरा व नगर हवेली जून १७८३ पासून पोर्तुगीजांच्या ताब्यात होते. दादरा नगर हवेली, उत्तरेला गुजरात आणि दक्षिणेला महाराष्ट्रासह ४९१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात पसरलेला आहे. दादरा नगर हवेलीमध्ये एकूण ७२ गावे असून राजधानी 'सिल्वासा' ही आहे. प्रदेशाचा ४० टक्के भाग जंगल आणि पर्वतांनी वेढलेला आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या २.२० लाख इतकी असून यामध्ये ६२.२४ टक्के आदिवासी आहेत. गुजरातच्या सह्याद्री पर्वतरांगांतून वाहणारी 'दमणगंगा' नदी अरबी समुद्राकडे वाहते. ही नदी या प्रदेशातील सिंचनाचा मुख्य स्त्रोत आहे.

येथील मुख्य भाषा गुजराती व हिंदी आहे व येथे ७९ % आदिवासी लोक राहतात. या प्रदेशांमध्ये मुख्यत: खरीप हंगामातील भात हे मुख्य पीक आहे. तसेच नागली व डोंगर बाजरी ही पिके सुद्धा घेतली जातात. फळांमध्ये आंबा, चिकू, केळी आणि ऊस यांचे सुद्धा पीक घेतले जाते. भौगोलिकदृष्ट्या ४० टक्के क्षेत्र हे जंगलांनी व्यापलेले आहे. Dan udyog Sahakari Sangh Ltd अंतर्गत येथील उद्योग क्षेत्राचा विकास झाला.

दादरा आणि नगर हवेलीमध्ये सर्व धर्मीयांचे सण-उत्सव साजरे केले जातात. बरश हा एक मोठा सण येथे साजरा केला जातो ज्याचे महत्व दिवाळी या सणाइतके मानले जाते. दादरा आणि नगर हवेलीच्या विविध प्रकारच्या लोक आणि आदिवासी नृत्यामध्ये तारपा नृत्य, घेरिया नृत्य, भवाडा नृत्य, ढोल नृत्य आणि तूर आणि थाली नृत्य ई. प्रमुख नृत्य आणि गायन प्रकार आहेत. पर्यटनाच्यादृष्टीने हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा आहे कारण हा प्रदेश निसर्ग प्रकृतीने नटलेला आहे.

दादर आणि नगर हवेली असंख्य स्वदेशी आदिवासी गटांचे घर आहे. यापैकी, वारली जमातीचे अतुलनीय कौशल्य आणि कुशल सर्जनशीलता त्यांच्या भिंतींच्या चित्रांमध्ये स्पष्ट आहे. चौरस, वर्तुळ आणि त्रिकोणासारख्या अत्यावश्यक घटकांसह, आदिवासी एक साधी भिंत बदलून सभोवतालच्या जगाची त्यावर छाप पाडतात. सूर्य, चंद्र, झाडे आणि निसर्ग यांची त्यांच्या कलेद्वारे प्रशंसा करतात. वारली पेंटिंगमध्ये अनेक आकृतिबंध आहेत जे दैनंदिन जीवनाला उत्सव म्हणून दर्शवतात.




### दादरा व नगर हवेलीच्या स्वातंत्र्याचा इतिहास

भारतातील 'दादरा व नगर हवेली' या केंद्रशासित प्रदेशाच्या इतिहासात



**११ ऑगस्ट : दादरा-नगर हवेली मुक्तिदिन**

११ ऑगस्ट हा दिवस अतिशय खास आहे. इ.स. १९६१ मध्ये याच दिवशी हा प्रदेश भारतीय प्रजासत्ताकचा एक भाग बनला व केंद्रशासित प्रदेश म्हणून समाविष्ट करण्यात आला.

'दादरा व नगर हवेली' हा प्रदेश प्रदीर्घ संघर्षानंतर २ ऑगस्ट १९५४ रोजी पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्या राजवटीपासून स्वतंत्र झाला. १९५४ ते १९६१ पर्यंत दादरा नगर हवेलीमध्ये नागरी परिषदेचे शासन होते, ज्याला 'वरिष्ठ पंचायत' म्हटले जात असे. १९६१ मध्ये तो भारतीय प्रजासत्ताकचा एक भाग बनला.

'दादरा व नगर हवेली'चा भारतातील विलीनीकरणाचा इतिहास खूप रंजक आहे. प्रदीर्घ संघर्षानंतर इथल्या लोकांना स्वातंत्र्य मिळाले. पूर्वी हा प्रदेश गोव्यासह केंद्रशासित प्रदेश होता! डिसेंबर २०१९ मध्ये केंद्र सरकारने दादरा व नगर हवेली आणि दमण व दीव (केंद्रशासित प्रदेशांचे विलीनीकरण) विधेयक २०१९ अन्वये 'दादरा व नगर हवेली' आणि 'दमण व दीव' यांचे विलीनीकरण करून एक केंद्रशासित प्रदेश (२६ जानेवारी २०२०) बनवला. त्यापूर्वी हे दोन्ही स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश म्हणून स्थापन करण्यात आले होते.

'दादरा व नगर हवेली' आणि 'दमण व दीव' हे दोन्ही केंद्रशासित प्रदेश बराच काळ पोर्तुगीजांच्या ताब्यात होते. दमण व दीव हा १९६१ ते १९८७ पर्यंत 'गोवा, दमण आणि दीव'चे केंद्रशासित प्रदेश होता. पण १९८७ मध्ये गोव्याला राज्याचा दर्जा मिळाल्यावर 'दमण व दीव' हे स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश बनले.

### भारतात विलीनीकरण

भारतात इंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्याला वेग आल्याने येथेही पोर्तुगीजांविरुद्धचे स्वातंत्र्ययुद्ध शिगेला पोहोचले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले पण इंग्रजांप्रमाणे पोर्तुगीजांनी आपल्या ताब्यातील प्रदेश सोडले नाहीत. त्यानंतर या मुद्द्यावरून संघर्ष अधिक तीव्र झाले. आत्माराम नरसिंह करमळकर हे पोर्तुगीज बँकेत अधिकारी होते. त्यांना 'अप्पासाहेब करमळकर' म्हणूनही ओळखले जाते. ते अप्रत्यक्षपणे गोवा मुक्ती संग्रामात सहभागी होते. गोवा मुक्त करायचा असेल तर दादरा नगर हवेलीही मुक्त व्हायला हवी, हे संघर्षाच्या काळात त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी स्थानिक नेत्यांची भेट घेतली आणि येथेही संघर्षाला वेग आला.

एका पोलिस स्टेशनमध्ये फक्त तीन पोलिस हजर होते. त्यात एकावर चाकूने हल्ला करण्यात आला आणि इतर दोघांना ताब्यात घेण्यात आले. यानंतर तेथे 'तिरंगा' फडकावण्यात आला आणि भारताचे 'राष्ट्रगीत' गायले गेले. दादरा हे 'दादरा मुक्त क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले. तसेच 'नरोली' येथील पोलीस ठाण्यावरही हल्ला करून हा परिसर पोर्तुगीज राजवटीतून मुक्त करण्यात आला. १ ऑगस्ट रोजी पिपिरिया पोलीस ठाणे देखील मुक्त करण्यात आले.

दरम्यान १ ऑगस्टच्या रात्री स्वयंसेवकांनी 'सिल्वासा' ताब्यात घेण्यासाठी ३ गट तयार केले आणि रात्रीच सिल्वासा पोलिस चौकी गाठली. पोलीस चौकीवर तिन्ही बाजूंनी नजर ठेवण्यात आली होती. मात्र अचानक झालेल्या हल्ल्यामुळे पोलिसांना शरण जावे लागले. स्वयंसेवक रात्रभर पोलीस चौकीतच थांबले. २ ऑगस्ट १९५४ रोजी सकाळी स्वातंत्र्याचे समर्थक पोर्तुगीज राजवट संपवण्यासाठी सिल्वासाला पोहोचले आणि त्यांनी दादरा आणि नगर हवेली मुक्त केली. तेव्हा ज्येष्ठ नेते सेनहार 'लुईस दा गामा' यांनी तेथे तिरंगा फडकावला व भारतीय राष्ट्रगीत गायले. तसेच दादरा आणि नगर हवेलीला भारतीय प्रजासत्ताकाचा भाग म्हणून घोषित केले. दादरा आणि नगर हवेलीचा 'केंद्रशासित प्रदेश' म्हणून समावेश करण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील १० वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली आणि ११ ऑगस्ट १९६१ पासून ती अंमलात आली.

## ऑगस्ट क्रांतीदिनी समरगीत स्फूर्तीगीत स्पर्धेचे आयोजन

**सांगली : हॅलो प्रभात**



महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने ९ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त समरगीत स्फूर्तीगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये गट सांगली अंतर्गत ८ कामगार कल्याण केंद्राच्या संघांनी सहभाग नोंदवला. सांगली, इस्लामपूर, कराड, सातारा, कुंडल, माडगूळे, तासगाव, मांजर्डे येथील कामगार व कुटुंबियांचे संघ सहभागी होतें. नोंदीत कामगार आणि बांधकाम कामगार तथा कुटुंबीय सहभागी झाले. कार्यक्रमाचे पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सतिश मालू, विजय भगत, संदीप वाघ, श्वेता कुलकर्णी, रामकृष्ण चितळे, महादेव पाटील उपस्थित होते. या स्पर्धेत क्रांती कारखाना पहिला क्रमांक, कामगार कुटुंबीय इस्लामपूर संघ द्वितीय तर किर्लोस्कर ब्रदर्स, किर्लोस्करवाडी कामगार संघ तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून शाहीर बजरंग आंबी, शाहीर अनिता एवळे, संदीप वाडेकर हे संगीत क्षेत्रातील जानकरांनी कामं पहिले.

## शरद कृषि महाविद्यालयात शाश्वत शेती दिन साजरा

**जैनापूर : हॅलो प्रभात**

येथील शरद कृषि महाविद्यालयामध्ये शाश्वत शेती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हरितक्रांतीचे प्रणेते भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. स्वामीनाथन यांनी गहू आणि भात पिकांची उत्पादकता, उत्पादन वाढीसाठी केलेले महत्त्वपूर्ण कार्य तसेच देशात अन्न सुरक्षा बळकट करण्यामध्ये असणारा मोलाचा वाटा व शाश्वत शेती बद्धलचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाला संस्थेचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन व आभार प्रा. पूजा भोसले यांनी मानले.

## 'छावा' चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




या स्वातंत्र्यदिनाच्या वीकेंडला भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा आणि अदम्य शौर्याचा भव्य उत्सव साजरा करण्यासाठी तयार राहा. २०२५ मधील सर्वात चर्चित ब्लॉकबस्टर 'छावा' चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर येत्या १७ ऑगस्ट रोजी, रविवार, रात्री८ वाजता स्टार गोल्ड वाहिनीवर होणार आहे. पहिल्यांदाच स्टार गोल्ड वाहिनीवर प्रेक्षकांना छावा मराठीत आणि हिंदीत पाहता येणार आहे.

## क्रांती दिनानिमित्त क्रांतिवीरांना अभिवादन

**येडेनिपाणी : हॅलो प्रभात**



९ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्वपूर्ण दिवस हा दिवस क्रांती दिन म्हणून ओळखला जातो. या क्रांती दिनाच्या निमित्ताने वाळवा तालुक्यातील क्रांतिवीरांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येडेनिपाणी गावातील २४ स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानार्थ उभारलेल्या स्मृतीस्तंभास गावच्या सरपंच शामबाला माळी यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी माजी सरपंच डॉ. सचिन पाटील, ग्रा.पं.सदस्य व ईश्वरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सी.एच. पाटील, माजी सरपंच रमेश पाटील, वाळवा पं.स.माजी सदस्य आनंदराव पाटील, वाळवा पश्चिम मंडल भाजप अध्यक्ष डॉ.सचिन पाटील, उपसरपंच प्रताप पाटील, महेश शिंदे, ग्रामपंचायत सदस्या शितल पाटील, रूपाली शिंदे, दिपाली हांडे, माजी उपसरपंच एस.ए.पाटील, डॉ.प्रा.दिपक स्वामी आदी मान्यवर व स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार उपस्थित होते.

## डॉ.कदम महाविद्यालयात राखी प्रदर्शनाचे आयोजन




**सांगली : हॅलो प्रभात**

भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात स्वयंनिर्मित राखी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस.व्ही.पोरे यांच्या हस्ते करण्यात आले. राखी प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पर्यावरणपूरक व प्लास्टिक मुक्त तसेच विविध नैसर्गिक वस्तुंचा वापर करून आकर्षक व रंगीबेरंगी राख्या तयार करण्यात आल्या. याप्रसंगी प्र. प्राचार्य डॉ. एस.व्ही.पोरे, उपप्राचार्य डॉ.अमित सुपले, कनिष्ठ विभागप्रमुख प्रा.अरूण जाधव, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.आर. एस. काटकर आदि मान्यवरांना विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या. कार्यक्रमाच्या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. पोरे म्हणाले, रक्षाबंधन यातून बहीण-भावाचे पवित्र नाते अधिक दृढ होते. यातून त्यांच्यामध्ये भावनिक प्रेम, आपुलकी, आत्मीयता निर्माण होते. हा एक पवित्र सण जो भावंडांमधील प्रेम आणि नात्याचा सन्मान करणारा आहे. यात बहीण आपल्या भावाच्या हातावर राखी बांधते, आणि त्याच्या आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुरक्षिततेसाठी प्रार्थना करते.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.वासंती गावडे यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. आर. एस. काटकर यांनी मानले. या प्रदर्शनाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

K.E. Society's
**Rajarambapu Institute of Technology, Rajaramnagar**
**(Diploma)**
Sakharale, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli, Pin-415414
Accredited by NAAC 'A+', AICTE, New Delhi.
Website : www.ritindia.edu, Email: director@ritindia.edu

**ADMISSION NOTICE 2025-2026**
**FEW SEATS ARE VACANT AGAINST CAP**

Applications are invited for Vacant Seats Against CAP for following **Direct Second Year Diploma** Courses.

| No. | Course Name | Vacant Seats |
|---|---|---|
| 1 | Civil Engineering | 4 |
| 2 | Mechanical Engineering | 0 |
| 3 | Electrical Engineering | 1 |
| 4 | Computer Engineering | 1 |
| 5 | Mechatronics | 0 |

**Eligibility : For Direct Second Year: Passed Higher Secondary School Certificate (HSC Science /MCVC/ITI) or its equivalent, with at least 35% aggregate marks.**
**Important Note: All types of candidates aspiring for admission under Against CAP seats, it is mandatory to get documents verified & confirmed at Scrutiny Center.**
**Contact: 8275822721, 7020262665**
**Director**

# सांगली अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**सांगली : हॅलो प्रभात**




सांगली अर्बन बँकेची ८९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेस गतवर्षी पेक्षा जास्त सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेपूर्वी सभासद प्रशिक्षण झाले. यावेळी प्रा. सतीश होनराव यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर सभासदांना अत्यंत विस्तृत मार्गदर्शन केले, वक्ते सतीश होनराव यांचा परिचय संदीप कुलकर्णी यांनी करून दिला. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना होनराव सर यांनी उत्तरे दिली.

या सभेचा प्रारंभ दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाला. प्रास्ताविकामध्ये अध्यक्ष गणेश गाडगीळ म्हणाले की, बँकेस २०२४-२५ या आर्थिक वर्षात रु.१४ कोटी ६७ लाख इतका निव्वळ नफा झाला आहे. बँकेच्या ठेवींमध्ये ९६ कोटीची वाढ होऊन एकूण ठेवी रु.१२७७ कोटी २१ लाख इतक्या झाल्या आहेत. तसेच कर्जा मध्ये रु.७२ कोटी इतकी वाढ होऊन रु.७६० कोटी ७२ लाख इतके कर्जांचे वाटप झाले आहे.

बँकेच्या एकत्रित व्यवसायात वाढ होऊन २००० कोटींचा टप्पा पार झाला आहे. बँकेच्या एन.पी.ए मध्ये लक्षणीय घट होऊन निव्वळ एन.पी.ए चे प्रमाण केवळ १.२२ % इतके आहे. रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे सी.आर.ए.आर चे प्रमाण किमान १२ % आवश्यक आहे ते १४.९२ % इतके झाले आहे. बँकेच्या एकूण प्रगतीमध्ये उपाध्यक्ष व सर्व सहकारी संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ सदस्य, कर्मचारी यांची मोलाची मदत व सहकार्य मिळाले आहे. तसेच आगामी काळात शाखा विस्तार करणे आणि ग्राहकांसाठी नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त सेवा देणे शक्य होणार आहे असेही अध्यक्ष गाडगीळ यांनी सांगितले. आधुनिकतेच्या जगात सभासदांना आवश्यक त्या आधुनिक सुविधा पुरविल्या जातील असे आश्वासन गाडगीळ यांनी यावेळी दिले. सांगली शहरांमध्ये अनेक शाखा जवळजवळ आहेत. त्यामुळे व्यवसायावर परिणाम होतो. म्हणून अशा काही जवळ असलेल्या भागात स्थलांतर करण्याचा तसेच शाखा विस्तार करण्याचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला. याशिवाय नफा तोटा पत्रकाची वाटणी, लेखापरीक्षक नियुक्ती, लेखापरीक्षकांनी सुचवलेली कर्ज खाती निर्लेखित करणे आदी ठराव यावेळी मंजूर करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक यांनी विषयांचे वाचन केले.

यावेळी उपस्थित सभासद यांचे तर्फे अध्यक्ष गणेश गाडगीळ, उपाध्यक्ष श्रीपाद खिरे, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक सर्व संचालक मंडळ यांचा विशेष सत्कार करणेत आला,

या सभेस उपाध्यक्ष सी. ए श्रीपाद खिरे, संचालक सर्व सी. ए अनंत मानवी, संजय पाटील, श्रीकांत देशपांडे, डॉ. रवींद्र आरळी, एच.वाय पाटील, संजय धामणगावकर, शैलेंद्र तेलंग, सागर फडके, सागर घोंगडे, रणजित चव्हाण, सतीश मालू यांच्यासह बँकेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन सचिन कुलकर्णी यांनी केले. सुहास दिवेकर यांनी पसायदान म्हटले व सभेची सांगता झाली.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



# संमिश्र

## पदनाट्यद्वारे वाहतूक नियमांचे जनजागृती



गुरुकुल प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा उपक्रम

**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

येथील गुरुकुल प्राथमिक विद्यालय मार्फत वाहतुकीचे नियम या विषयावर पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून वाहतुकीचे नियम कशा पद्धतीने पाळले पाहिजेत व स्वतःचे व कायद्याचे रक्षण कसे केले पाहिजे, हेल्मेटचा वापर करणे, झेब्रा क्रॉसिंगचा वापर, असा संदेश पथनाट्याच्या माध्यमातून वडगाव नगरीच्या लोकांपर्यंत पोहोचवण्यात आला.या पथनाट्याचे लेखन व मार्गदर्शन विद्यालयाच्या प्रशासिका सौ.एम.एस चौगुले यांनी केले.तसेच सहाय्यक शिक्षिका सौ.एस.एम.यादव यांनी तयारी करून घेतली. यासाठी संस्थापक अध्यक्ष डॉ. डी.एस.घुगरे यांची प्रेरणा मिळाली.विद्यालयाच्या सचिव व मुख्याध्यापिका सौ.एम डी.घुगरे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच सांस्कृतिक विभाग अन्य शिक्षक व पोलीस यंत्रणेची मोलाची मदत मिळाली.

## शेतमजुरांच्या मुलाची महावितरणमध्ये निवड



एकाच वेळी तिघांची निवड झाल्याने तालुक्यात चर्चेचा विषय

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पन्हाळा तालुक्यातील बोरी वडे गावात शेतीसाठी पाणीपुरवठा नसल्याने पिके फक्त पावसाळ्यातच घेतली जातात. रोजगाराच्या संधींचा अभाव असल्याने गावातील अनेकांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते. अशाच परिस्थितीत, शंकर पोवार हे शहरातील हॉटेलमध्ये मिळेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.त्यांच्या मुलाने, योगेश शंकर पोवार यांनी, कठोर परिश्रम व स्पर्धा परीक्षेतील यशाच्या बळावर महावितरण कंपनीत विद्युत सहाय्यक म्हणून निवड मिळवली. विशेष म्हणजे, यावेळी पन्हाळा तालुक्यातील एकाच परीक्षेत तिघा तरुणांची निवड झाल्याने संपूर्ण तालुक्यात या घटनेची चर्चा रंगली आहे.योगेश यांच्या यशामध्ये अयोध्या हॉटेलचे मालक सचिन शानबाग यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य मोलाचे ठरल्याचे शंकर पोवार यांनी सांगितले.एकाच वेळी तिघांची निवड झाली असल्याने तालुक्यातील बोरवडे गावचे कौतुक केले जातं आहे.मुलांनी जिद्द चिकाटी या जोरावर गावचे नाव उज्वल केले असल्याचे माजी सरपंच दिलीप पाटील यांनी सांगितले.या आनंदोत्सवासाठी गावातील नागरिकांनी ढोल-ताशांच्या गजरात, वाजतगाजत मिरवणूक काढली. कार्यक्रमास कीशोर तुकाराम पाटील, संतोष रंगराव शिंदे, माजी सरपंच दिलीप पाटील, उपसरपंच मानसिंग जाधव, अमित शेळके, अमिन पाटील, अवधून पाटील, अमोल माने पाटील, सागर लबडे, संतोष पाटील, महादेव शिंदे, धनाजी कदम, कुण्णान पवार, उत्तम पोवार, यश पोवार तसेच मराठा रियासत ग्रुप बोरी वडेचे सर्व कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजे रामराव महाविद्यायात 'क्रांती दिन' भित्तीपत्रकेचे उद्घाटन



**जत : हॅलो प्रभात**

राजे रामराव महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने ९ ऑगस्ट या क्रांती दिनाचे औचित्य साधून भारतीय स्वातंत्र्य चळवळ या भित्तीपत्रिकेचे आयोजन करण्यात आले होते. या भित्तिपत्रिकेचे उद् घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव करेनव्वर यांच्या हस्ते व मराठी विभाग प्रमुख प्रा.कुमार इंगळे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.रामदास बनसोडे, हिंदी विभाग प्रमुख डॉ.यादव मोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.सतिशकुमार पडोळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. प्रारंभी इतिहास विभाग प्रमुख डॉ.पुडलिंक चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन भित्तीपत्रिका घेण्यामागील उद्देश सांगितला. यावेळी उद्घाटन पर बोलताना उपप्राचार्य प्रा. महादेव करेनव्वर म्हणाले की, स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. अनेक वीरांच्या त्याग आणि बलिदानातून स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे, याचे स्मरण आजच्या युवकांनी केले पाहिजे. स्वातंत्र्य व लोकशाही अबाधित राखण्यासाठी आपण तत्पर असले पाहिजे.असेहि ते शेवटी म्हणाले. प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत इतिहास विभाग प्रमुख डॉ.पुडलिक चौधरी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनिल लोखंडे यांनी तर शेवटी आभार प्रा.विशाल गोडबोले यांनी मानले. यावेळी डॉ.ज्ञानेश्वर कांबळे, प्रा.सदाशिव माळी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाठक वृद्धाश्रमात रक्षाबंधन संपन्न

**मिरज : हॅलो प्रभात**

रक्षा बंधनाच्या निमित्ताने मिरजेतील पाठक वृद्धाश्रम येथे भाजप कार्यकर्ते व सामाजिक उपक्रमात सहभागी असणारे सचिन दादा पिसे परिवार आणि मित्रमंडळाच्या वतीने वृद्ध व्यक्तींना राखी बांधून त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले. आपलेपणाने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे आश्रमातील वृद्ध भारावून गेले होते. यावेळी सचिन पिसे,सिद्धी पिसे,अमित पिसे, राकेश शिंदे, विजय कात्रले यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'गोकुळ'कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

'गोकुळ सलंग्न' कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूरची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महालक्ष्मी सांस्कृतिक भवन, शाहूपुरी येथे चेअरमन सचिन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक मंडळाच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.प्रास्ताविकात चेअरमन सचिन पाटील यांनी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. संस्थेची आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली - वसूल भांडवल २६ कोटी २७ लाख, ठेवी ५७ कोटी ८० लाख, कर्ज वितरण ९२ कोटी ३ लाख, चालू नफा ३४ लाख १५ हजार, खेळते भांडवल ९४ कोटी ४५ लाख,

### सभासदांना ८% लाभांश जाहीर; विकासासाठी महत्त्वाचे निर्णय



तर वार्षिक उलाढाल १७२ कोटी ८१ लाख.सभेत शेअर भांडवलावर ८% लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच सुवर्ण महोत्सव निधीची तरतूद, सभासदांसाठी ऐच्छिक विमा योजना, संस्थेच्या इमारतीची दुरुस्ती व सुधारणा, तसेच गोकुळ दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्र सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली. हे निर्णय संस्थेच्या सर्वांगीण विकासाला चालना देतील, असा विश्वास चेअरमन पाटील यांनी व्यक्त केला.यावेळी संस्थेच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या कर्मचारी व सभासदांचा सत्कार करण्यात आला. स्वागत व अहवाल वाचन सचिव संभाजी माळकर यांनी केले, तर आभार माजी चेअरमन राजेंद्र चौगले यांनी मानले.याप्रसंगी व्हा. चेअरमन पांडुरंग कापसे, संचालक राजेंद्र चौगले, जयदिप आमते, रामचंद्र पाटील, गोविंद पाटील, तुकाराम शिंगटे, सुनिल वाडकर, संदेश भोपळे, सतिश पोवार, दत्तात्रय डवरी, अशोक पुणेकर, संचालिका माधुरी बसवर, गीता उत्तुरकर, तसेच सभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी व लहान ट्रॅक्टर मालकांवर आर्थिक संकट

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने नुकतीच जारी केलेली (G.S.R. ४८५(E)) ही मसुदा अधिसूचना महाराष्ट्रासह देशभरातील कोट्यवधी शेतकरी व लहान ट्रॅक्टर मालकांवर आर्थिक संकट ओढवू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. या नियमांमुळे शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरवर हजारो रुपयांची अनावश्यक उपकरणे बसवण्याची सक्ती होणार असून, हा थेट शेतकऱ्यांच्या खिशावर दरोडा असल्याची भावना व्यक्त होत आहे.

ही अधिसूचना मुख्यतः मालवाहू ट्रॅक्टर साठी नवीन तांत्रिक नियम लागू करते. मात्र, या व्याख्येत शेतीसाठी वापरले जाणारे ट्रॅक्टरही येऊ शकतात.

### नवीन मसुदा अधिसूचनेवर तीव्र नाराजी




ऋझड ट्रॅकिंग डिव्हाइसची सक्ती : प्रत्येक ट्रॅक्टरला खड-१४० प्रमाणित व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस बसवावे लागणार, ज्याचा खर्च सुमारे ८,००० ते १५,००० रुपये. ब्लॅक बॉक्स (EDR) बसवणे अनिवार्य : अपघात झाल्यास माहिती रेकॉर्ड करणारे हे उपकरण १५,००० ते २५,००० रुपये खर्चिक. ट्रॉलीसाठी नवीन मानके : नवीन मेकॅनिकल कपलिंग व इलेक्ट्रिकल कनेक्टर बंधनकारक केल्यामुळे जुन्या ट्रॉली बदलाव्या लागतील किंवा अपग्रेडसाठी मोठा खर्च करावा लागेल या अटींचा समावेश आहे. शेतकऱ्यांच्या मते, हा नियम त्यांना अधिक कर्जबाजारी करून अनावश्यक तंत्रज्ञानाचा भार टाकणारा आहे. त्यामुळे हॉलेज ट्रॅक्टरच्या व्याख्येतून शेतीसाठी वापरले जाणारे सर्व ट्रॅक्टर वगळावेत किंवा अधिसूचना तात्काळ रद्द करावी, अशी एकमुखाने मागणी होत आहे.

> दिल्लीत एसी कार्यालयात बसून शेतकऱ्यांसाठी कायदे करणाऱ्यांना शेतीची व्यथा कळत नाही. आमचा बळीराजा महामार्गावर व्यावसायिक वाहतूक करत नाही, मग त्याच्यावर अशा महागड्या उपकरणांची सक्ती का? आधीच महागाई व निसर्गाच्या लहरीपणाने त्रस्त शेतकऱ्याला हा खर्च परवडणारा नाही. सरकारने वास्तवाचे भान ठेवून ही अधिसूचना तात्काळ रद्द करावी.
>
> **-आ. सतेज पाटील**

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी 'जवाहर'चा ६७ लाख ७६ हजारांचा धनादेश



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ६७ लाख ७६ हजार रुपयांचा धनादेश आमदार राहुल आवाडे यांनी नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे सुपूर्द केला.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नुकताच वाढदिवस साजरा झाला. वाढदिवसाचे औचित्य साधत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वाढदिवस दिनी कोणताही फलक, बॅनर न लावता अथवा जाहिरातबाजी न करता अनावश्यक खर्चाला फाटा देऊन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी आर्थिक योगदान देण्याचे आवाहन केले होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून शासकीय योजनेत समावेश नसलेल्या विविध प्रकाराच्या आजारांवरील उपचारासाठी आर्थिक सहाय्य केले जाते.

त्याच अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार त्यांची सामाजिक भानाची संकल्पना कृतीत उतरविण्यात आली.सातत्याने सामाजिक बांधिलकी जोपासण्यासह प्रत्येक सामाजिक कार्यात मदतीचा हात देणाऱ्या हुपरी-यळगुड (ता.हातकणंगले) येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ६७ लाख ७६ हजार रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आमदार राहुल आवाडे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना शुभेच्छा देत धनादेश मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांचेकडे सुपूर्द केला.

# 'आरोग्य आपल्या दारी'उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोतोली : हॅलो प्रभात**

शाहूवाडी व पन्हाळा तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील महिलांच्या आरोग्य समस्यांवर तत्काळ उपाययोजना व्हावी, तसेच विविध आजारांवर मात करता यावी, या उद्देशाने आरोग्य आपल्या दारी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. डॉ. दीपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, संजीवनी सखी मंच आणि संजीवनी फाउंडेशन यांच्या संयुक्त

### डॉ.स्वाती पाटील यांचे योगदान कौतुकास्पद



विद्यमाने, भाजपा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्या डॉ. स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पन्हाळा-शाहूवाडी परिसरात मोफत आरोग्य शिबिरे व फिरत्या दवाखान्यामार्फत सेवा पुरविली जात आहे. फिरता दवाखाना-महिलांसाठी वरदान पन्हाळा तालुक्यातील घोटवडे व पंचक्रोशी भागात मोफत फिरता दवाखाना सुरू असून, महिलांना उपचार, तपासण्या आणि आवश्यक औषधे मोफत मिळत आहेत. नुकत्याच घोटवडे येथे आयोजित शिबिरात ग्रामस्थ व महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.यावेळी सरपंच राजाराम पाटील, उपसरपंच बाळाबाई बुवा, पोलीस पाटील विजया कुंभार, सामाजिक कार्यकर्ते आण्णासो कुंभार, आनंदा पाटील तसेच गावातील महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ.डॉ.अशोकराव माने यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पेठवडगांव : हॅलो प्रभात**

हातकणंगले विधानसभा मतदारसंघाचे दलितमित्र आ.डॉ.अशोकराव माने यांच्या पेठ वडगांव येथील जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन जनसुराज्य शक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आ.डॉ.विनयरावजी कोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आमदार डॉ. अशोकराव माने (बापू) यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. जनसंपर्क कार्यालयामुळे सर्व सामान्य लोकांची कामे होणार आहेत, त्याच बरोबर तालुक्याला कामातसाठी जावे लागणार नाही. सोहळ्यासाठी कोल्हापूर जिल्हा बँकेचे संचालक विजयसिंह माने, माजी जि प सदस्य अरुण इंगवले,वारणा साखर कारखान्याचे संचालक सुभाष जाधव, उदय पाटील, सुभाष पाटील,वडगांव बाजार समिती सभापती सुरेश पाटील, राजाराम साखर कारखाना चेअरमन दिलीप पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अरविंद माने,माजी नगराध्यक्ष मोहनलाल माळी, भाजपा ओबीसी जिल्हाध्यक्ष अशोक माळी, राजेंद्र माने सर,अजय थोरात,भाजपा मंडल अध्यक्ष अमरसिंह पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष विश्वास माने, सुहास राजमाने, राजाराम साखर कारखाना संचालक शिवाजी पाटील,वारणा दुध संघाचे संचालक राजवर्धन मोहिते, महेंद्र शिंदे,वारणा बँक संचालक प्रकाश माने,शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

# राजर्षी शाहू पतसंस्थेची घोडदौड सुरूच

**कुरुंदवाड : कुलदीप कुंभार**

राजर्षी शाहू नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्षात नेत्रदीपक कामगिरी केली आहे. संस्थेने सहकार कायद्यातील नवीन धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, काटकसरीचे धोरण आणि पारदर्शक व्यवस्थापनामुळे १ कोटी २५ लाख १९ हजार रुपयांचा विक्रमी निव्वळ नफा कमावला आहे. संस्थेच्या ठेवी १०५ कोटींच्या पुढे गेल्या असून, सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संस्थेचे अध्यक्ष रावसो उगारे यांनी जैन सांस्कृतिक भवनात झालेल्या संस्थेच्या

### १०५ कोटींच्या ठेवी, १.२५ कोटींचा नफा आणि १२ टक्के लाभांश जाहीर



३४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही माहिती दिली.यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना रावसो उगारे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. संस्थेने सातत्याने शून्य टक्के एनपीए (नॉन-परफॉर्मिंग सेट्स) राखल्यामुळे संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे जेष्ठ संचालक आणि माजी नगराध्यक्ष दादासो पाटील यांनी संस्थेच्या प्रगतीचे कौतुक करताना, संस्थेने केवळ व्यावसायिक उद्दिष्टे न ठेवता सामाजिक बांधिलकीही जपली असल्याचे नमूद केले.

या सभेमध्ये संस्थेचे सचिव संजय गजन्नावर यांनी विषयपत्रिकेवरील विविध विषयांचे वाचन केले. सर्व सभासदांनी एकमताने या विषयांना मंजुरी दिली. या वेळी माजी नगराध्यक्ष रावसाहेब पाटील, उपाध्यक्ष महावीर पोमाजे, जिनगोंडा पाटील, दादासो पाटील, किरण आलासे, आण्णासो गुदले, धनपाल कोथळी, पद्माराणी पाटील, धोंडीराम चौगुले, सुषमा उपाध्ये, आयेशा बागवान यांच्यासह इतर संचालक उपस्थित होते. संस्थेच्या या यशाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# संजीवनी स्कुलमध्ये पर्यावरण पुरक रक्षाबंधन साजरा

**पन्हाळा : हॅलो प्रभात**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळवीती, संत तुकाराम महाराजांच्या या अभंगाच्या ओळी सार्थ ठरवत, आज संपूर्ण देशभरात धार्मिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणाचा संदेश देत, श्रावण महिन्यातील पवित्र रक्षाबंधन सण उत्साहात साजरा झाला. भारतीय संस्कृतीतील सण व उत्सव हे केवळ मानवी आनंदासाठी नसून, सर्व जीवमत्रांच्या उत्कर्षासाठी निर्माण झालेले आहेत. या सणांच्या मागे पर्यावरणप्रेम आणि विज्ञाननिष्ठतेचा संदेश दडलेला असतो. विद्यार्थ्यांना हा संदेश समजावून देणे ही आजची गरज आहे. याच भावनेतून पन्हाळा येथील संजीवन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी यंदाचा रक्षाबंधन सण आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरा केला. रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमा या पवित्र पर्वाचे



औचित्य साधून, विद्यार्थ्यांनी शाळा व परिसरातील झाडांना राख्या बांधल्या.

पर्यावरण रक्षणाची पवित्र भावना जपत, देशी झाडांचे संरक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेऊन रक्षाबंधनाचा उत्सव साजरा करण्यात आला. संजीवन संकुलातील मुलींनी सर्व मुलांना राख्या बांधून मिठाई भरवली. तसेच शिक्षक, सुरक्षारक्षक आणि मुख्याध्यापकांना राख्या बांधून आशीर्वाद घेतले. मुख्याध्यापक बेलेकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, आपल्या भारतीय सण व परंपरेत विज्ञाननिष्ठा आणि पर्यावरण जागृतीची परंपरा आपल्या पूर्वजांनी जपली आहे. आपण सर्वांनी पर्यावरणाचे भान ठेवून आपले सण साजरे करावेत. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक अमोल राऊत, विद्या साळोखे, वैशाली सोरटे, सुलोचना पाटील, शीतल शिंदे, अमृता माने तसेच सर्व शिक्षकांचे विशेष योगदान लाभले.

# रावसाहेब पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगलीतील बहुआयामी व्यक्तिमत्त्व, भारतीय जनता पार्टी जैन प्रकोष्ठचे राज्य उपाध्यक्ष, महाराष्ट्र जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य व दक्षिण भारत जैन सभेचे केंद्रीय उपाध्यक्ष रावसाहेब पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात आणि मोठ्या लोकसहभागातून साजरा करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक व आर्थिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि मित्रपरिवारांनी पाटील यांच्या निवासस्थानी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांमध्ये आमदार सुधीरदादा गाडगीळ, आमदार सुरेशभाऊ खाडे, भाजपा महिला मोर्चाच्या




राज्य उपाध्यक्षा नीता केळकर, भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ. स्वातीताई शिंदे, माजी नगरसेवक आयुब पठाण, माजी नगरसेवक राजेश नाईक, ज्येष्ठ करसल्लागार किशोर लुल्ला, प्राचार्य डॉ. डी. डी. चौगुले, लट्ठे एज्युकेशन सोसायटीचे सचिव ॲड. सुहास पाटील, दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील,जनसुराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित दादा कदम, दक्षिण भारत जैन सभेचे डॉ. अजित पाटील, तसेच माजी महापौर सुरेश पाटील, शांतीसागर पतसंस्था समडोळीचे चेअरमन सुरेश पाटील, राज्य पतसंस्था फेडरेशनचे महासचिव शशिकांत राजोबा, कर्मवीर पतसंस्थेचे संचालक डॉ. रमेश ढबू, एस. पी. मगदूम, हिंदू एकता आंदोलनाचे अध्यक्ष नितीन शिंदे, शैलेश पवार यांच्यासह मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त गणेश नगर चारिटेबल ट्रस्ट व जैन प्रकोष्ठ यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश नगर हॉल येथे रक्तदान शिबिर व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. रक्तदान व नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन माननीय आमदार सुधीरदादा गाडगीळ यांच्या हस्ते झाले. या उपक्रमांना परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याचबरोबर अनाथ आश्रमात फळ वाटप करण्यात आले, तसेच इंसाफ फाउंडेशनना आर्थिक मदत आणि निर्धार फाउंडेशनला सहाय्य देण्यात आले.

रावसाहेब पाटील यांनी सर्व मान्यवर, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले. सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव यांचा संगम असलेला हा वाढदिवस, उपस्थिती व उपक्रमांमुळे विशेष संस्मरणीय ठरला.



# राजे रामराव महाविद्यालयात वृक्ष राखी महोत्सव संपन्न

**जत : हॅलो प्रभात**

येथील राजे रामराव महाविद्यालयात रक्षाबंधन निमित्त सांस्कृतिक विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष राखी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या परिसरात असणाऱ्या वृक्षांना राखी बांधून एक अनोखा रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम. एच. करेनवर हे होते. या महोत्सवाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना ते म्हणाले, आज पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज बनलेली आहे. सांस्कृतिक विभागाच्या वतीने घेण्यात आलेला हा उपक्रम अतिशय आदर्शवत आहे. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पर्यायाने समाजामध्ये पर्यावरण रक्षणाची जागरूकता निर्माण होते आणि अशा प्रकारची जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

वृक्ष राखी महोत्सवाचा शेवट वृक्ष रक्षणाची शपथ घेऊन झाला. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनींनी महाविद्यालयातील वृक्षांचे संरक्षण अभिवचन दिले. या महोत्सवाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सतीशकुमार पडोळकर यांनी केले, तर आभार प्राध्यापक रोहिणी शिंदे यांनी मानले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी व गुरुदेव कार्यकर्याकर्त्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

# शीतल म्हात्रे यांच्यासारखे गद्दार, गट सोडून गेले तरी शिवसेना संपत नाही

## प्रशांत जाधव

**मुंबई : हॅलो प्रभात**

शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपविभाग प्रमुख प्रशांत मानसिंग जाधव यांनी आमदार शीतल म्हात्रे यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली आहे. जाधव यांनी म्हात्रे यांना 'गद्दारीचं मूर्तिमंत उदाहरण' म्हणत, त्यांच्यावर विश्वासघात केल्याचा गंभीर आरोप केला आहे.



श्री.जाधव यांनी पुढे म्हटले आहे की, ज्या उद्धवसाहेबांनी तुम्हाला राजकारणात ओळख दिली, व्यासपीठ दिले आणि महिलांच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी ताकद दिली, त्याच नेत्यांविरोधात आज तुम्ही घाणेरडं बोलत आहात. ही कृतघ्नता आणि गद्दारीची परिसीमा आहे. शिवसेनेच्या निष्ठावंत रक्तात गद्दारी सहन केली जात नाही. ज्या लोकांसोबत आज म्हात्रे आहेत, त्यांनीच पूर्वी शिवसेनेला संपवण्याची भाषा केली होती आणि आता म्हात्रे त्यांचीच भाषा बोलत आहेत, असा आरोपही जाधव यांनी केला.

शिवसैनिक गप्प बसणार नाहीत, उद्धव ठाकरे हे आमच्या हृदयाचे नेते आहेत आणि त्यांच्यावर बोलणाऱ्यांनी अगोदर आरशात बघावे, असेही ते म्हणाले. त्यांनी इशारा दिला की, जनता म्हात्रेंना विसरणार नाही आणि त्यांचे नाव इतिहासात ङ्गधोकाङ्ख या शब्दासमोर लिहिले जाईल. जाधव यांनी शेवटी म्हटले की, शीतल म्हात्रे यांच्यासारखे गद्दार गट सोडून गेले, तरी शिवसेना संपत नाही. कारण शिवसेना ही जनतेच्या काळजात आहे.

# सर्किट बेंचच्या कामकाजाची पालकमंत्र्यांनी केली पाहणी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचच्या कामकाजाला १८ ऑगस्टपासून सुरुवात होत असून, इमारतीची सुरू असलेली कामे वेळेत आणि गतीने पूर्ण होत असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. त्यांनी छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयासमोरील जुन्या न्यायालयाच्या इमारतीमधील प्रस्तावित सर्किट बेंच इमारतीच्या सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, शाखा अभियंता रोहण येडगे, कंत्राटदार अनिकेत जाधव व उदय घोरपडे यांच्यासह कोल्हापूर जिल्हा बार



असोसिएशनचे ड. इंद्रजित चव्हाण, टी. एस. पाडेकर, व्ही. आर. पाटील, के. व्ही. पाटील, मनोज पाटील, संग्राम देसाई, प्रमोद पाटील उपस्थित होते.

पालकमंत्री आबिटकर यांनी यावेळी तिन्ही इमारतींच्या कामांना प्रत्यक्ष भेट देऊन उभारण्यात येणाऱ्या तीन कोर्ट रूम्सची पाहणी केली. यावेळी त्यांनी बांधकाम विभागाकडून सुरू असलेल्या कामकाजाची माहिती जाणून घेतली.

येत्या १८ ऑगस्टपासून कामांना सुरुवात होणार असल्याने इमारतींचा ताबा न्यायालयाकडे ११ ऑगस्टला देणे आवश्यक असून, याबाबत पुढील तीन दिवसांत इमारत न्यायालयीन कामकाजासाठी हस्तांतरण करण्याचे नियोजन असल्याचे बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले.

यावेळी बोलताना पालकमंत्री म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील व्यवस्था या सर्किट बेंचच्या माध्यमातून पुन्हा एकदा सुरू होत आहे. कोल्हापूरच्या इतिहासामध्ये अशा अनेक व्यवस्था लोकांना स्थानिक पातळीवर देण्यात आल्या होत्या.

सर्किट बेंच कोल्हापूरात सुरू झाल्याने आपल्यासाठी ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. येत्या १८ ऑगस्टला हा बेंच प्रत्यक्षात सुरू होताना कोल्हापूरसह शेजारील पाच जिल्ह्यांमध्ये आनंदोत्सव साजरा केला जाईल.



# भाजपा महिला आघाडीच्या वतीने रक्षाबंधन

**मिरज : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टी मिरज शहर महिला आघाडीच्या वतीने शनिवारी रक्षा बंधन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भाजप महिला आघाडीच्या नेत्या व कार्यकर्त्या यांनी भाजपचे शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते याना राखी बांधली. तसेच शहरातील लक्ष्मी मार्केट परिसरातील रिक्षा चालकांना देखील भाजपा महिला कार्यकर्त्यांनी राखी बांधली व त्यांची मने जिंकली. मिरज शहर पोलीस निरीक्षक किरण रासकर व मिरज शहर पोलीस ठाण्यातील अन्य अधिकारी व कर्मचारी याना देखील भाजपा महिला कार्यकर्त्यांनी राखी बांधून त्यांचा सन्मान केला.

भाजपा नेत्या सौ.रसिकाताई खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात माजी महापौर सौ.संगीता खोत, मिरज मंडळ अध्यक्षा अनिता हारगे, अनघा कुलकर्णी, गायत्री सातपुते, कल्पना मस्के, वर्षाराणी वांडरे , रेखा शेजवळ, अनिता साळुंखे, रुपाली पवार यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.



# कलाशिक्षक डी.बी पाटोळे यांचा सत्कार संपन्न

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

कामेरी (ता.वाळवा) येथील डॉ.बापूजी साळुंखे विद्यालय कामेरी चे कलाशिक्षक डी.बी पाटोळे यांचा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूरचे कार्याध्यक्ष अभयकुमारजी साळुंखे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक संकल्प बापूजी साळुंखे यांच्या ३८ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित चित्र प्रदर्शनामध्ये केलेल्या सहकार्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना डी.बी. पाटोळे म्हणाले या सत्काराने आत्मविश्वास दुणावला असून या पुढील काळात विद्यार्थी दैवत मानून त्याला कला अध्यापनाचे काम करू.

या सत्कार प्रसंगी संस्थेचे सी. इ .ओ कौस्तुभ गावडे , प्रशासन सहसचिव.एस.एम. गवळी, विद्या समितीचे अध्यक्ष श्रीराम साळुंखे सांगली जिल्हा विभाग प्रमुख पी.एल.हाके, रायगड विभाग प्रमुख उत्तम गलांडे, सातारा जिल्हा विभाग प्रमुख शशिकांत काटे उपस्थित होते.



# होड्यांच्या शर्यतीत सांगलवाडीच्या तरुण मराठा बोट क्लबची बाजी

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

क्रांती दिनानिमित्त इचलकरंजी शेतकरी तरुण, बेंदूर उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित होड्यांच्या शर्यतीत सांगलवाडीच्या तरुण मराठा बोट क्लबने सलग तिसर्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवत चांदीची गदाही पटकविली. तर डिग्रज बोट क्लब डिग्रजने दुसरा, कवठेसारच्या युवा शक्ती बोट क्लबने तिसरा आणिर डिग्रजच्या जय मल्हार बोट क्लबने चौथा क्रमांक मिळविला. स्पर्धेनंतर आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिस वितरण करण्यात आले.

इचलकरंजी शेतकरी तरुण, बेंदूर उत्सव मंडळाच्यावतीने क्रांती दिनाचे औचित्य साधत मागील ३५ वर्षांपासून पंचगंगा नदीत होड्यांच्या शर्यती घेतल्या जात आहेत. प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही शर्यतीला प्रतिसाद मिळून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील १० बोट क्लबने सहभाग नोंदविला होता. शर्यतीचा शुभारंभ सहकार महर्षि कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली भाजपा ज्येष्ठ नेते पांडुरंग म्हातुकडे यांच्या हस्ते करण्यात आला.

पाण्याला असलेला वेग आणि त्यातून शर्यतीमध्ये निर्माण झालेली चुरस पाहून प्रेक्षकांकडून सर्वांना प्रोत्साहन दिले जात होते. पंचगंगा नदीच्या दोन्ही काठावर तसेच लहान, मोठ्या पुलावर शर्यत शौकिनांनी तसेच महिलांनीही मोठी गर्दी केली होती. प्रथम क्रमांकासाठी देण्यात येणारी चांदीची फिरती गदा मध्यवर्ती सहकारी हातमाग विणकर संघाचे चेअरमन प्रकाश दत्तवाडे यांच्यातर्फे देण्यात आली आहे.

यावेळी पोलीस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता, अप्पर पोलीस अधिक्षक आण्णासाहेब जाधव, उपअधिक्षक विक्रांत गायकवाड, श्रीरंग खवरे, अमृत भोसले, अनिल कुडचे, शेखर शहा, राजू पुजारी, इचलकरंजी शेतकरी तरुण, बेंदूर उत्सव मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कलागते, उपाध्यक्ष नंदु पाटील, अहमद मुजावर, पापालाल मुजावर, शांताप्पा मगदूम, राहुल घाट, शिवाजी काळे, तानाजी कोकितकर, सागर गळदगे, शिवाजी माळी, सागर मगदूम, डॉ. विजय माळी, राजेंद्र बचाटे, इरफान अत्तार, वसीम बागवान, शशिकांत नेजे यांच्यासह मान्यवर, शर्यत शौकिन उपस्थित होते.

# वाङ्.मय मंडळात भाषेची आवड निर्माण करण्याचे सामर्थ्य

## डॉ.अनिल सुगते : मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात निसर्ग सोहळा संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

वाङ्.मय मंडळ म्हणजे भाषेतील साहित्य आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जतन करण्यासाठी तसेच भाषेचा आणि साहित्याचा प्रचार आणि प्रसार करणे, तसेच विद्यार्थिनींमध्ये भाषेची आवड निर्माण करण्याचे मोठे सामर्थ्य वाङ्.मय मंडळामध्ये असते असे प्रतिपादन श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या वाङ्.मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'निसर्गसोहळा' या कार्यक्रमात प्र.प्राचार्य डॉ.अनिल सुगते यांनी निसर्गावर आधारित सुंदर गीत 'फिटे अंधाराचे जाळे' सादर करून वांङ्.मय मंडळाचे उद्घाटन झाले असे जाहीर केले. तसेच ही कविता सुप्रसिद्ध कवी सुधीर मोघे यांची असून, या कवितेत,



अंधार जाऊन आकाश मोकळे, झाल्यावर निसर्गामध्ये होणारे बदल आणि नवी सुरुवात यांचे सुंदर वर्णन आहे; असे मत व्यक्त केले.

डॉ.सुगते पुढे म्हणाले की, निसर्गाच्या सानिध्यात मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. कवी मनाला तर निसर्ग म्हणजे त्याचं प्रेरणास्थान निसर्गातला ऋतू बद्दल, समुद्राची गाज, शीतल वायुलहरी, हिरवागार गालिचा, ढगाआडून डोकावणारा चंद्र, कोसळता धबधबा, झुळझुळ वाहणारे झरे, सूर्यास्त असो की सूर्योदय अशा किती तरी गोष्टी कवीचं हळवं मन टिपकागदासारखं टिपून घेत असतात आणि त्याच्या कवी मनातून काव्याची कमळे उमलतात .तसेच फिल्म व साहित्याचा जवळचा संबंध आहे. तसेच निसर्गाचे निरनिराळे रंग आपल्या आयुष्याची रंगत वाढवत असतात. हे सांगताना 'डफोडिल्स' 'विल्यम वड्र्स्वर्थ', 'श्रेया घोषाल' यांचे 'पावसात वेडे मन मोर नाचले' या गीताचा उल्लेख करून 'श्रावण' महिन्यात पावसाळ्यातील आनंदाचे आणि निसर्गाच्या जवळ असल्याचे वर्णन आहे. निसर्गाच्या प्रत्येक रंगात एक वेगळा आनंद आहे.

या कार्यक्रमामध्ये मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्लिश या भाषेमधील निसर्गावर आधारित काव्यवाचन, काव्यगायन, प्रसंग वर्णन यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. नंदिनी काळे यांनी निसर्गाबाबत आपले विचार व्यक्त करताना बालकवींच्या साहित्याचा आढावा घेतला. या कार्यक्रमासाठी 'वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या' अध्यक्ष डॉ. लताताई देशपांडे, उपाध्यक्ष श्रीमती स्मिताताई केळकर, कार्यवाह श्रीमती यशश्री आपटे व सहकार्यवाह श्रीमती गायत्री कुलकर्णी व अन्य संस्था सदस्यांचे प्रोत्साहन लाभले.

ज्युनिअर विभागाच्या पर्यवेक्षक श्रीमती सुनिता माळी यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. त्याचप्रमाणे 'शंकर वैद्य' यांची 'जिकडे तिकडे पाणीच पाणी' ही कविता सादर केली. तसेच श्रीमती सोनाली संकपाळ यांनी स्वरचित 'पाऊस' ही कविता सादर केली तर सुप्रिया टाकारे यांनी निसर्ग कवी 'विल्यम वड्र्स्वर्थ' यांची 'डॅफोडिल्स' कविता सादर केली. या कार्यक्रमासाठी भाषा विषयक शिक्षकांचे योगदान लाभले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नीता कारंडे यांनी केले. तर वांङ्.मय मंडळ प्रमुख श्रीमती ऋचा नातू यांनी आभार व्यक्त केले.



## शिवसेना स्थानिक 'स्वराज्य'च्या निवडणुका ताकतीने लढविणार

### बाबुशेठ टायवाले

**राहुरी : दिनेश गायकवाड**

राहुरी येथे शिवसेना जिल्हा प्रमुख दक्षिण बाबुशेठ टायरवाले यांच्या अध्यक्षतेखाली आगमी जिल्हा परिषद.पंचायत समिती,नगरपालिका निवडणुका लढविण्याच्या दृष्टीने राहुरी तालुक्यातील शिवसेना पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. याप्रसंगी शिवसेना राहुरी तालुका प्रमुख देवेंद्र लांबे पा.,गट प्रमुख सुभाष जुंदरे,महिला तालुका प्रमुख वनिता जाधव,उपतालुका प्रमुख अनिल आढाव, सुनील खपके उपस्थित होते.याप्रसंगी शिवसेना राहुरी तालुका प्रमुख देवेंद्र यांनी प्रास्ताविक करतांना म्हणाले कि, शिवसेना पक्षाचे मुख्यनेते एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राहुरी तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लढविण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे. स्थानिक स्वराज्य संस्था लढविण्यासाठी



शिवसेना पक्ष शिवसैनिकांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे असे श्री.लांबे-पाटील म्हणाले.

या कार्यक्रमात शिवसेना वांबोरी विभागाच्या उपतालुका प्रमुख पदी सागर नामदेव मोरे यांची जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायवाले यांच्या हस्ते पत्र देवून निवड करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात बोलतांना जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायवाले म्हणाले कि,शिवसैनिक हा शिवसेना पक्षाचा व पक्षाचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांचा आत्मा आहे.

शिवसेनेचा इतिहास आहे ,प्रस्थापित राजकीय घराणेशाही विरोधात सर्वसामान्य शिवसैनिक मंत्री, खासदार,आमदार झाले आहेत.राजकारणात यशस्वी होण्यासाठी शिवैनिकांनी येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका शिवसेना पक्षाच्या वतीने महायुती सोबत पूर्ण ताकतीने लढवायच्या आहेत. या प्रसंगी आभार तालुका संघटक महेंद्र उगले यांनी मानले. या बैठकीस ड.निलेश धुमाळ, ड.अमोल शेळके,बाळासाहेब जाधव,किशोर पवार,निखील भोसले,ज्ञादेव जाधव,दादा खाडे,पांडूरंग देठे,नवनाथ आढाव,बाप्पू काळे,विजय तोडमल,रमेश म्हसे, अंकुश पवार, डॉ.सचिन पवार, सदानंद शिरसाठ,ऋषी सरोदे, सौरभ जाधव,संदीप काकड, अविनाश क्षीरसागर,सचिन जाधव,संदीप खाडे,महेंद्र शेळके आदी शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## औक्षण करत सुप्रिया सुळे यांच्या निवासस्थानी रक्षाबंधन



**दौंड : हॅलो प्रभात**

संपूर्ण महाराष्ट्रात रक्षाबंधन सण हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्राच्या राजकारणातही अनेक भाऊ-बहीण रक्षाबंधन सणाला एकत्र येतात आणि आनंदात हा सण साजरा करतात. याच रक्षाबंधन सणाला खा.सुप्रिया सुळे यांनी औक्षण करत बंधू श्रीनिवास पवारांना राखी बांधली.

## एक राखी जवानांसाठी-संजीवनी युवा प्रतिष्ठानचा उपक्रम



सव्वा लाख राख्यांसह सैनिकांसोबत रक्षाबंधन साजरे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

देशभक्ती आणि भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला सलाम करत, कोपरगाव येथील संजीवनी युवा प्रतिष्ठानने विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली एक राखी जवानांसाठी या उपक्रम ांतर्गत सव्वा लाख राख्यांचा संकल्प घेऊन, ४ ऑगस्ट रोजी शिर्डीहून श्रीनगरकडे ऐतिहासिक यात्रेचा शुभारंभ केला होता. हा अद्वितीय राखी रथ मधून संजीवनी युवा सेवक सीमारेषेवर तैनात शूर सैनिकांसाठी राख्यांचा अमूल्य ठेवा घेऊन रवाना झाले आहेत त्यांनी दिल्ली येथे सैनिकांसोबत रक्षाबंधन साजरे केले.

रक्षाबंधनाला दिल्ली येथील सैनिक ट्रांझिट कॅम्पमध्ये या रक्षा रथाचे सैनिक बांधवांनी मनःपूर्वक स्वागत केले. सैनिकांनी राखी रथाला आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या आणि रक्षाबंधनाचा हा पवित्र सण तेथेच राखी बांधून साजरा केला. भावना आणि उत्साहाने भरलेला हा क्षण सर्वांच्या हृदयात देशभक्ती आणि बंधुभावाची ज्वाला अधिक प्रखर करणारा ठरला.सैनिकांना रक्षाबंधन साजरे करताना अत्यंत भावनिक वातावरण निर्माण झाले होते. सीमेवरती देश रक्षणासाठी तैनात असणाऱ्या वीर जवानांना सण उत्सवाला आपल्या कुटुंबासमवेत वेळ देता येत नाही. मात्र संजीवनी युवा प्रतिष्ठानने रक्षाबंधनाचा स्तुत्य उपक्रम राबविल्याने सैनिकांनी अतिशय कौतुक करत या उपक्रमाला धन्यवाद दिले. यंदा या राखी उपक्रमाची व्याप्ती वाढली असून, एक लाखाहून अधिक राख्या संकलित करून तब्बल २,२०० किलोमीटरचा प्रवास केला जात आहे. साईबाबांच्या पावन भूमी शिर्डीहून निघालेला हा राखी रथ कोपरगाव, येवला, मनमाड, मालेगाव, धुळे, शिरपूर, सेंधवा, इंदोर,ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, दिल्ली, अंबाला, अमृतसर, पठाणकोट, जम्मू, उधमपूर मार्गे श्रीनगर येथे पोहचून रक्षाबंधन समारोह साजरा करून भव्य समारोप होईल.या यात्रेदरम्यान शेकडो ठिकाणी रक्षा रथाचे पुष्पवृष्टीने स्वागत केले जात आहे. ही फक्त एक यात्रा नसून, देशाच्या शूर जवानांप्रती प्रेम, सन्मान आणि कृतज्ञतेची एक अमर गाथा आहे.

## तर या शिक्षकांना पदोन्नती यादीतून वेगळावे : राजेंद्र उंडे

**राहुरी : हॅलो प्रभात**

केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी पदवी व शिक्षणशास्त्र हि पदवी घेताना शाळेत रजा न टाकता पदवी धारण करणाऱ्या शिक्षकांची नावे पदोन्नत्ती यादीतून वगळून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आनंद भंडारी यांच्याकडे देवळाली प्रवरा येथील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र उंडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. केंद्रप्रमुख पदोन्नती २०२४- २०२५ च्या प्रक्रियेतून ज्या प्राथमिक शिक्षकांनी केंद्रप्रमुख हि पदोन्नत्ती घेण्यासाठी शिक्षक पदवीधर किंवा शिक्षणशास्त्र हि पदवी प्राप्त केलेली आहे. शिक्षकांनी कोणतीही पदवी घेताना रजा टाकून शिक्षण घेणे गरजेचे आहे.



त्यासाठी विद्यालयातील ७५% उपस्थितीची अट असते.तरच परीक्षेला बसता येते. शिक्षक मात्र शाळेत हजर राहुन पदवी व शिक्षणशास्त्राचे शिक्षण घेत असल्याचे समोर आले आहे. एकीकडे पगार घेयचा आणि दुसरीकडे नियमित शिक्षण घेतल्याचे दाखविले जाते. यावरुन शासनाची फसवणूक केली जात आहे.शाळेत रजा न टाकता नियमित (रेगुलर) पद्धतीने पदवीचा व बी.एड. चा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांची नावे केंद्रप्रमुख पदोन्नत्ती यादीतून वगळण्यात येवून प्रशासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्या शिक्षकांवर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी उंडे यांनी केली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने दि.२९ मे २०२७ रोजी सेवाज्येष्ट पदवीधर शिक्षकांची यादी प्रसिद्ध केलेली आहे त्या यादीत पदवीधर शिक्षकांचे पदवीचे गुणपत्रक, पदवीचे प्रमाणपत्र, शिक्षणशास्त्र (बी.एड) चे गुणपत्रक व प्रमाणपत्र तसेच सेवापुस्तकातील दीर्घ मुदत रजेचा तपशील आदी बाबींची पडताळणी करावी.शिक्षणशास्त्र व पदवी घेण्यासाठी शिक्षकांनी कोणत्याही प्रकारची रजा न टाकता नियमित पद्धतीने पदवीचा तीन वर्षांचा व शिक्षणशास्त्रचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. अशा पदवीधर शिक्षकांची नावे सेवाज्येष्ट पदवीधर शिक्षकांची यादीतून वगळण्यात यावी. ज्या शिक्षकांनी जिल्हा परिषद प्रशासनाची फरावणूक केली आहे.

त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागयांनी प्रसिद्ध केलेल्या यादीतील काही पदवीधर शिक्षकांणी कोणत्याही प्रकारची रजा न टाकता नियमितपणे पदवीचा व शिक्षणशास्त्र (बी. एड). चा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे अशा शिक्षकांना केंद्रप्रमुखपदी पदोन्नती दिल्यास प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडाण्यात येईल असा इशारा उंडे यांनी दिला आहे.

## सोयगांव (वेस) येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरूवात

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

सर्व धर्मानुरागी भाविकांना कळविण्यात येते की सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री महाबली हनुमान महाराज यांच्या कृपेने तसेच प.पु. सद्गुरु गंगागिरी महाराज यांचे कृपाशिर्वादाने व ह. भ. प. वैराग्यमूर्ती श्रीराम महाराज गाडेकर अंजनापुर यांच्या मार्गदर्शनाखाली व परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व रामायण वाचन तसेच भव्य कीर्तन महोत्सव आयोजित केला आहे तरी परिसरातील सर्व भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा ही विनंती समस्त ग्रामस्थ सोयगांव ( वेस ) यांच्या मार्गदर्शनाने चालत आलेला अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास बुधवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी सप्ताह सोहळ्यास प्रारंभ होत आहे या सप्ताहात कालावधी दररोज विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आलेले आहे.या काळात राज्यभरातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा सप्ताह कालावधीत संपन्न होणार आहे. यामध्ये १३ ऑगस्ट रोजी वैराग्यमूर्ती ह.भ.प.श्रीराम महाराज गाडेकर, १४ ऑगस्ट रोजी ह.भ.प.मयुर महाराज पाचोरे ,१५ऑगस्ट रोजी ह.भ.प. विश्राम महाराज ढमाले, १६ ऑगस्ट ह.भ.प.राजेंद्र महाराज चितळकर , १७ ऑगस्ट रोजी ह.भ.प. संदीप महाराज नाईकवाडी , १८ ऑगस्ट रोजी ह.भ.प. दिपक महाराज देशमुख,१९ ऑगस्ट ह.भ.प.हेमलताताई पिंगळे तसेच २० ऑगस्ट रोजी किर्तनकेसरी ह.भ.प. अर्जुन महाराज चौधरी यांचे सकाळी ९ ते ११ कालावधीत काल्याचे किर्तन तसेच यावेळी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे .तरी परिसरातील सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान यावेळी सोयगांव ( वेस ) ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## स्थानिक बाजारपेठेतून स्नेहलताताईंनी खरेदी केल्या राख्या

### कार्यकर्त्यांना राख्या बांधुन दिला एकतेचा संदेश

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

बदलत्या मुक्त अर्थव्यवस्थेत सर्वच क्षेत्रात नव नविन आव्हाने निर्माण होत आहे. ऑनलाईनच्या जमान्यात स्थानिक व्यापा-यापुढे निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासाठी माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी कोपरगांवच्या बाजारपेठेतुन राख्यांची खरेदी करत त्या कार्यकर्त्यांना बांधल्या त्यातुन त्यांनी एकतेचा संदेश दिला आहे. रक्षाबंधन हा भाउ बहिणींच्या पवित्र नात्याचा सण त्याचा आनंद स्थानिक पातळीवर अधिक द्विगुणित करण्यासाठी माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी थेट कोपरगांवच्या बाजारातुन स्थानिक व्यापा-यांकडुन राख्या खरेदी करत



कार्यकर्त्यांसोबत रक्षाबंधन साजरे करून अनोखा संदेश दिला आहे.प्रत्येक सणासुदीस लागणा-या साहित्याची खरेदी कोल्हे परिवार नेहमीच स्थानिक व्यापा-याकडुन करत असते, व इतरांनाही त्याबाबतची प्रेरणा दिली जाते. कोरोना महामारीनंतर आणि ऑनलाईनच्या जमान्यात प्रत्येक व्यावसायिकांसमोर अनेक संकटे उभी राहिली आहे त्यावर कशी मात करायची या चिंतेत हे व्यापारी बांधव असतात तेंव्हा प्रत्येकांने स्थानिक खरेदीला प्राधान्य द्यावे असे सांगुन त्या पुढे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व सर्व मंत्रीमंडळाने लाडकी बहिण योजनेतुन कायमस्वरूपी रक्षाबंधनाची मोठी आठवण दिलेली आहे. लाडक्या बहिणींना या योजनेचा मोठा आधार ठरत आहे. याशिवाय गोर गरीब घटकांसाठी विविध दर्जात्मक स्तरावरील योजनांची आखणी करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर महायुती शासनाचा भर आहे. पुरूषांच्या बरोबरीने महिला सर्वच क्षेत्रात कार्यरत आहे पण काही ठिकाणी महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले तेंव्हा मतदार संघातील प्रत्येक भावांनी पुढाकार घेत त्यांच्या अडचणी दुर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून रक्षाबंधनाची अनोखी भेट द्यावी.

## 'संजीवनी' च्या सर्व विभागांना सलग बारा वर्षांचे एनबीए मानांकन : अमित कोल्हे

**कोपरगांव : विनोद जवरे**

संजीवनी के.बी.पी. पॉलीटेक्निकच्या कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागांचे नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडीटेशन (एनबीए), नवी दिल्लीने आऊटकम बेस्ड एज्युकेशन निकषांनुसार मुल्यांकन करून पुढील तीन वर्षांसाठी मानांकन बहाल केले. मेक्ट्रॉनिक्स विभागाला यापुर्वीच मानांकन प्राप्त झालेले आहे. पॉलीटेक्निकचे सर्व विभाग सलग बारा वर्षे एनबीए हे सर्वोच्च मानांकन प्राप्त करणारे संजीवनी पॉलीटेक्निक हे महाराष्ट्रातील एकमेव पॉलीटेक्निक ठरले आहे, तसेच भारतातील फार थोड्या संस्थांना अशा प्रकारचे सलबग बारा वर्षांचे मानांकन आहे, अशी माहिती संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. संजीवनी पॉलीटेक्निकच्या या अभुतपुर्व उपलब्धीबाबत संजीवनीचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी चिफ टेक्निकल ऑफिसर श्री विजय नायडू, प्राचार्य ए. आर. मिरीकर, प्रशासकीय अधिकारी प्रकाश जाधव, विभाग प्रमुख व डीन्स डॉ. किशोर जाधव, प्रा. इरफान सय्यद, प्रा. योगेश जगताप, प्रा. गिरीश वट्टमवार, प्रा. मोहिनी गुंजाळ, डॉ. गणेश जोर्वेकर, प्रा.बाबासाहेब काकडे, नानासाहेब लोंढे, प्रा.राहुल भाकरे, डॉ. दिपक पैठणकर, प्रा.संदीप पाटील, प्रा.गणेश चांगण, प्रा.दिलिप पाटील, डॉ.संदीप सोनवणे, प्रा. अभिजीत पाबळे, नानासाहेब कोल्हे यांचे अभिनंदन केले.पत्रकात अमित कोल्हे यांनी म्हटले आहे की माजी मंत्री व संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष कै. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१६ मध्ये प्रथमतः मुल्यांकनासाठी सामोरे गेले तेव्हापासुन एनबीएच्या कसोटीला सामोरे जाणारे संजीवनी पॉलीटेक्निक हे महाराष्ट्रातील फार कमी संस्थांपैकी एक आहे.एनबीए कार्यपध्दतीनुसार एनबीए समितीने या विभागाने सादर केलेल्या सर्व बाबींची पुराव्यासहीत परीमानांनुसार पडताळणी केली आणि भेटीनंतर लागलीच एका महिन्यात सर्व विभागांना पुढील तीन वर्षांसाठी एनबीए मानांकन बहाल केल्याबाबतचे अधिकृत पत्र दिले. २०२६ ते २०२८ पर्यंत महाराष्ट्रातील ३७४ पॉलीटेक्निक पैकी संजीवनी पॉलीटेक्निक हे सर्व विभागांना सलग बारा वर्षे एनबीए मानांकन असणारे एकमेव पॉलीटेक्निक ठरले आहे.

## रक्षाबंधनाचा सण आश्रमशाळेत साजरा

**पिलीव : हॅलो प्रभात**

मातोश्री फौंडेशन महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधनाचा सण कोडोली येथील आश्रमशाळेत स्नेहपूर्वक साजरा करण्यात आला. तानाजी केकरे (सर) व जयश्री केंकरे (मॅडम) यांनी स्वतः आश्रमशाळेत जाऊन मुलांच्या मनगटावर प्रेमाची राखी बांधली व त्यांना खाऊ वाटप केले.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना आश्रमशाळेतील मुलेच उद्याचे अधिकारी बनू शकतात, शिक्षण हीच खरी शक्ती आहेअसा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी मातोश्री फौंडेशन महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष सचिन मानकर, केकरे दांपत्याचा सहपरिवार, शाळेचे शिक्षक पाटील व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.हा उपक्रम रक्षाबंधनाच्या पवित्र नात्याबरोबरच सामाजिक जबाबदारीचेही जिवंत उदाहरण ठरला.

## दुधगांव-आष्टा रस्ता दुरुस्तीची नागरिकांची मागणी

**दुधगांव : हॅलो प्रभात**

दुधगांव-आष्टा रस्ता दुधगांव पासून दीडकिलोमीटर खराब झाला असून सध्या या रस्त्यावर डागडोजीचे काम सुरू आहे. संबंधित कॉन्ट्रॅक्टर सागर मोहनानी यांनी स्पष्ट केले की, आम्हाला केवळ मोठे खड्डे भरण्याचेच काम मिळाले आहे. पूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे किंवा लहान खड्ड्याचे काम आमच्याकडे नाही,असे सांगितले. मात्र, सुरू असलेले डागडोजीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे दिसत आहे.याबाबत प्रतिक्रिया देताना स्थानिक नागरिक संदीप माने म्हणाले, सध्या जे डागडोजीचे काम सुरू आहे ते निकृष्ट दर्जाचे आहे. रस्त्यावर खडी व्यवस्थित न टाकता, डांबरही दर्जाहीन वापरले जात आहे. आणि पाऊस सुरू असल्याने हे काम काही दिवसांत उखडून परत खड्डे निर्माण होतील. संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी येऊन प्रत्यक्ष पाहणी करून या कामाची पडताळणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. नागरिकांचा रोष दिवसेंदिवस वाढत असून त्यांचा स्पष्ट आग्रह आहे की, तात्पुरत्या डागडोजीवर पैसा खर्च करण्यापेक्षा कायमस्वरूपी डांबरीकरण करणे गरजेचे आहे.

## आर.आर.शिंदे कनिष्ठ महाविद्यालयात हरित रक्षाबंधन उत्साहात

**राहुरी : हॅलो प्रभात**

राखीच्या पवित्र नात्याला पर्यावरणपूरक वळण देत, साधना विद्यालय व आर. आर. शिंदे कनिष्ठ महाविद्यालयात हरित रक्षाबंधन उत्साहात साजरा करण्यात आले. परंपरेने बहीण भावाला राखी बांधते, परंतु या अनोख्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व नागरीकांनी झाडांना राखी बांधून त्यांचे रक्षण करण्याचा संकल्प केला. हरित सेनेतील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचे औचित्य साधून कापड, कागद, बिया, कापूस, वाक यांच्या वापर करून जवळ जवळ १०० पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या व त्या विद्यालयातील वृक्षांना बांधून त्यांच्या सुरक्षिततेची शपथ घेतली. आजच्या काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण व आर्थिक विकासच्या नावाखाली प्रंचड वृक्षतोड होत आहे. परिणामी समृद्ध जैवविविधता असलेली



आपली भूमी ओसाड बनत चालली आहे. महावृक्ष तोडून त्यांच्या जागी लहान रोपे लावल्याने पर्यावरणाचे नुकसान भरून येण्यासारखे नाही. निसर्ग स्वतः परिपूर्ण आहे फक्त मानवी हस्तक्षेप रोखणे गरजेचे आहे. असे मत शाधना विद्यालय व आर. आर. शिंदे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य दत्तात्रय जाधव यांनी व्यक्त केले. साधना विद्यालयातील हरित सेना पथकातील विद्यार्थ्यांसाठी हरित रक्षाबंधन या उपक्रमाचे योजन केले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना वृक्ष हे आपल्या जीवनातील महत्वाचा घटक आहे. प्रत्येकाने वृक्षांची लागवड करून त्यांची जोपासना करणे, त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे गरजेचे आहे. हरित रक्षाबंधन पर्यावरणीयदृष्ट्या महत्वाचे आहे तसेच आजच्या आधुनिक युगात खूप महत्वाचे आहे, असे मत राष्ट्रीय हरित सेनेचे प्रमुख श्री. अमोल चंदनशिवे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.जाधव, उपमुख्याध्यापिका योजना निकम, पर्यवेक्षिका माधुरी राऊत, साधना सुर्वे, पर्यवेक्षक अजय धनवडे उपस्थित होते.

## मनोज राऊत यांचा प्रशंसापत्र देऊन सन्मान

**नातेपुते : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र कमांडो फाउंडेशन संचलित रेस्क्यू कमांडो फोर्स नातेपुते जिल्हा सोलापूर येथील ७५ कमांडो घेऊन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मनोज राऊत यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात पुणे शहर व ग्रामीण हद्दीत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा रथासोबत भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनासोबत. पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार , अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उप-आयुक्त मिलिंद मोहिते, पोलीस उप-आयुक्त हिम्मत जाधव सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मनोज राऊत यांनी आपत्ती व्यवस्थापनचे उत्कृष्टरित्या काम पाहिल्याबद्दल पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालय येथे प्रशंसा पत्र देऊन सन्मान केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



**सुवर्णसंधी**



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५०००/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७०००/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १००००/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976